**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **GRN** | MH006653894202223E | **BARCODE** | | **Date** | 18/04/2022-15:32:24 | **Form ID** | |

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Non-Judicial Stamps-Consolidated Stamp Duty<br>Inspector General of Registrations | **TAX ID / TAN (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | AAGCM4481Q |
| **Office Name** | BRL 10_JT SUB REGISTRAR BORIVALI 10 | **Full Name** | M E PROJECT PRIVATE LIMITED |
| **Location** | MUMBAI | | |
| **Year** | 2022-2023 One Time | **Flat/Block No.** | B 406 MAYUR CHS LTD |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0030046401 Consolidated Stamp Duty85 | 35000.00 | **Road/Street** | SODAWALA CROSS LANE |
| | | **Area/Locality** | BORIVALI WEST MUMBAI |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | 4 0 0 0 9 2 |
| | | **Remarks (If Any)** | NALLA CLEANING AT MBMC AREA |
| | | **Amount In Words** | Thirty Five Thousand Rupees Only |
| **Total** | 35,000.00 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Payment Details** | BANK OF BARODA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 02003942022041800699 | 1282807377 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 18/04/2022-15:35:49 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | BANK OF BARODA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :
Mobile No. : 8879271111

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

For M/S. M. E. PROJECT PVT. LTD.

Authorised Signature

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## सार्व. आरोग्य विभाग

सन २०२२-२३

# // करारनामा //

कंत्राटदाराचे नाव :- **मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि.**
बी/406, मयुर कॉ.ऑ.हौ. सोसायटी लि.,
सोडावाला, क्रॉस रोड, बोरिवली (प.)
मुंबई, 400092.

कामाचे नाव :- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफाई /खोदाई करणे कामी भाड्याने यंत्र सामुग्री व हंगामी कंत्राटी मजुर पुरवठा करणे.**

कामाची मंजुरी :- **मा. स्थायी समिती सभा दि. १२/०४/२०२२, ठराव क्र. 02.**

Scanned with CamScanner

# // करारनामा //

करारनामा लिहून देणार :- मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि.
बी/406, मयुर कॉ.ऑ.हौ. सोसायटी लि.,
सोडावाला, क्रॉस रोड, बोरिवली (प.)
मुंबई, 400092.

करारनामा लिहुन घेणार :- उप-आयुक्त (आरोग्य),
मिरा भाईंदर महानगरपालिका

कारणे करारनामा लिहुन देण्यात येतो की,..................

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई/खोदाई व इतर कामाकरीता करारनामा लिहून देणार यांचे दर मा. स्थायी समिती सभा दि. १२/०४/२०२२, ठराव क्र. ०२ अन्वये मंजूर करण्यात आले आहेत. त्यानुसार काम पूर्ण करुन देण्याची जबाबदारी करारनामा लिहून देणार यांची राहील.

## -: अनुसुची :-

| Sr.No. | Type of Machinery, Equipments | मंजुर दर (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| A | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2100/- PER HOUR |
| | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2400/- PER HOUR |
| | JCB MACHINE | Rs. 1075/- PER HOUR |
| | TORAS | Rs. 9990/- PER SHIFT |
| | DUMPER | Rs. 7200/- PER SHIFT |
| | HAYDRA MACHINE | Rs. 990/- PER HOUR |
| B | MAN POWER | Rs. 1250/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR) |

**अटी शर्ती :-**

१) नाले सफाई कामाच्या देयकातुन २% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल.

२) नाले सफाई कामातुन निघालेला गाळ/ माती याची विल्हेवाट लावणेची जबाबदारी निविदाकाराची राहील. स्वतः जागा उपलब्ध करून गाळ/ माती विल्हेवाट लावणे बंधकारक आहे. तसेच नाले सफाई करत असताना निघालेला घनकचरा यामध्ये प्लास्टिक व इतर घरगुती तसेच औद्योगिक कचरा असेल तो मनपाच्या प्रक्रिया प्रकल्पावर टाकण्यात यावा.

For M/S. M. E. PROJECT PVT. LTD.

Scanned with CamScanner

३) महानगरपालिका मालकीची मालमत्ता जसे नाला, गटार, स्लॅब, भिंत इत्यादी नाले सफाई कामात अडथळा निर्माण होत असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेऊन तोडणे बंधनकारक आहे.

४) नालेसफाईची कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी काही वेळा यंत्रसामुग्री द्वारे आवश्यकतेनुसार जादा तास काम करणे बंधनकारक आहे.

५) नाले सफ़ाई करताना निविदाकारांच्या यंत्रसामुग्रीमार्फत खाजगी किंवा मनपा, बांधकाम तुटल्यास अथवा तोडावे लागल्यास, त्या बांधकामाचा सर्व खर्च निविदाकारास करणे बंधनकारक आहे.

६) यंत्रसामुग्री व कंत्राटी मजुर प्रत्येक वेळी नाल्यापर्यंत वाहतुक करणे तसेच सुरक्षा विषयक साहित्य व नालेसफाईच्या कामाकरीता लागणारे साहित्य वस्तुंचा पुरवठा स्वखर्चाने करण्यात यावा. सर्व मजुरांच्या सुरक्षेची जबाबदारी निविदाकाराची असेल.

७) निविदाकाराने दररोज केलेल्या कामाबाबत संबधित विभागातील स्वच्छता निरिक्षकाची अहवाल व चलनावर स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. याकामी आवश्यक लागणारी चलन बुक, अहवाल बुक इत्यादी स्टेशनरी स्वखर्चाने छपाई करावी.

८) निविदाकाराने निविदेत सादर केलेल्या वाटाघाटी अंती मंजुर केलेल्या दरा व्यतिरिक्त कोणतेही वाढीव दर /कर /इतर भत्ते महापालिका देय असणार नाही.

९) कार्यादेशात नमुद केलेल्या यंत्रसामुग्रीच्या संख्येत आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. जादा यंत्र सामुग्री व साहित्य मजुरांची आवश्यकता लागल्यास त्याच मंजुर दरात पुरवठा करावयाचा आहे.

१०) नालेसफ़ाईची कामे करताना जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन,टोरस, हायड्रा मशिन व कंत्राटी हंगामी मजुरांमार्फत कोणत्याही प्रकारचा अपघात किंवा जिवीत वा वित्तहानी झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाकारांवर राहील.

११) नाले सफाईचे काम चालु असताना कोणात्याही परिस्थितीत चार तासा पेक्षा जास्त काळ यंत्र सामुग्री बंद राहणार नाही याची खबरदारी निविदाकाराने घ्यावयाची आहे. तसे झाल्यास तातडीने पर्यायी व्यवस्था करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

१२) निविदाकाराने काम समाधानकारक न केल्यास किंवा काम मध्येच सोडल्यास दंड करण्यात येईल. तसेच कार्यादेश व करारनामा रद्द करण्यात येईल व द्वितीय लघुतम दराच्या निविदाकारास कंत्राट दिल्यास येणा-या मूळ फरकाची रक्कम प्रथम निविदाकारकडून वसूल करण्यात येईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम व इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

१३) निविदाकाराने नालेसफाईचे संबधित सर्व कामांचे सुरु होण्यापुर्वी, काम सुरू असताना व काम पुर्ण झाल्यानंतर यापध्दतीने झालेल्या कामाचे दररोज GeoTag केलेले फ़ोटो व छायाचित्रीकरण करुन, फोटो व छायाचित्रीकरण देयका सोबत जोडून सार्व. आरोग्य विभागात सादर करणे बंधनकारक आहे.

For M/S. M. E. PROJECT PVT. LTD.

Authorised Signatory



Scanned with CamScanner

१४) ठेकेदाराने नाले सफाई करणाऱ्या कंत्राटी मजुरांचे पुर्ण नाव हजेरीपत्रकारावर नोदवून स्वतःकडे मस्टर अद्यावत करून ठवणे बंधनकारक आहे.

१५) नाले सफाई करणाऱ्या कंत्राटी मजुरांचे वेतन अदा केल्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक आहे.

१६) मजुरांमार्फत नाले सफाई करताना आवश्यक असलेले साहित्य, सुरक्षा उपकरणे (Handgloves, Gumboot, Mask) संबंधित स्वच्छता निरिक्षकाकडे पुरवठा करण्यात आलेल्या मजुरांच्या संख्येनुसार काम सुरु होण्यापुर्वी जमा करणे बंधनकारक आहे.

१७) कंत्राटी मजुरांकडून नाले सफाईचे काम करून घेताना कंत्राटी मजुरांनी सुरक्षा विषयक साहित्याचा वापर करण्याची जवाबदारी निविदाकराची राहील.

१८) नालेसफाईचे काम करतेवेळी कामगांराना इजा झाल्यास प्राथोमोउपचार व वैद्यकीय व्यवस्था करणे बंधणकारक आहे.

१९) निविदाकाराने आवश्यकतेनुसार स्वतंत्र पर्यवेक्षकाची नेमणुक करून त्याची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक संबंधीत स्वच्छता निरिक्षक, प्रभाग अधिकारी तसेच सार्व.आरोग्य विभागास कळविणे बंधनकारक आहे. तसेच पर्यवेक्षकाचे कुठलेही देयक मनपा. अदा करणार नाही.

२०) नाले सफाईची कामे करताना कांदळवनाच्या झाडाची हानी, पर्यावरण विषयक नियमातील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. नाले सफाईचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीत अधिका-यांना समक्ष दाखवुन प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

२१) नाले सफाई कामावर प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरिक्षक तसेच मा. आयुक्त यांनी नेमणुक केलेले सर्व अधिकारी यांचेमार्फत देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येईल.

२२) नाले सफाईचे काम पुर्ण झाल्यानंतर संबंधीत स्वच्छता निरीक्षक/ अधिकारी यांना केलेले काम समक्ष दाखवुन प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

२३) सर्व वाहने आर.टी.ओ फिटनेस प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच चालकाचा वाहन चालवण्याचा परवाना, वाहनांचे इंश्योरंन्स ईत्यादी बाबी वेळोवेळी सादर करणे बंधनकारक आहे.

२४) कोरोना (COVID - 19) विषाणूमुळे संसर्ग उद्भवल्यास नाले सफाई कामावर काम करणाऱ्या हंगाम कंत्राटी मजुरांना सुरक्षेसाठी मास्क, हॅन्डग्लोज, सॅनिटायझर/ साबण पुरवठा करणे बंधनकारक आहे.

२५) यंत्रसामुग्री, साहित्य, हंगामी कंत्राटी मजुर नाले सफ़ाईसाठी असुन पावसाळ्या दरम्यान अतिवृष्टीत पुर परिस्थिती निर्माण झाल्यास महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री, साहित्य, हंगामी कंत्राटी मजुर त्याच मंजूर दरात पुरविणे निविदाकारास बंधनकारक राहील.

२६) निविदाकारांनी ठेक्याच्या कालावधीत Risk Insurance Policy काढणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

२७) बाल मजुर कायदा पर्यावरण कायादा १९८६ नियमांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक आहे. याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

२८) निविदाकाराने कंत्राटी कामगारांना कामगार कायद्यानुसार असलेले किमान वेतन देय व साहित्य इत्यादी देणे बंधनकारक राहील.

२९) नाले सफ़ाई कामी काढलेला गाळ वाहतुकी करिता वापरात येणा-या वाहन क्रमांक व वाहनांचे कागदपत्र झेरॉक्स आरोग्य विभागाकडे देणे बंधनकारक राहील.

३०) निविदाकाराने वय ५५ वर्षेच्या वरील मजुर नाले सफाई कामासाठी घेऊ नये.

३१) निविदाकारावर प्रचलित शासकीय नियम पाळणे व बाल कायदा अंतर्गत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

३२) सर्व शासकीय विविध कर भरण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील.

३३) निविदाकारा समवेत महानगरपालिकेने केलेल्या करारनामा/ कार्यादेशाची मुदत एक वर्षाची राहील.

३४) निविदाकाराने मंजुर दरात नाले सफाई कामा व्यतिरिक्त इतर कामाकरीता आवश्यकतेनुसार कंत्राटी मजुर, डंपर, टोरस, जे.सी.बी. व इतर यंत्रसामुग्रीचा पुरवठा सार्व. आरोग्य विभाग तथा मनपाच्या अन्य विभागास पुरवठा करणे बंधनकारक राहील.

३५) कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यास मा. न्यायालय ठाणे क्षेत्र न्यायालय राहील.

३६) निविदेसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद ठाणे न्यायालयात सोडविण्यात येईल व सदरचा निर्णय दोन्ही पक्षकारास बंधनकाकर राहील.

३७) कंत्राट कालावधीतील कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे निविदारावर बंधनकारक राहील.

३८) निविदाकाराने निविदासोबत जोडलेले कागदपत्रे, निविदा व इतर कागदपत्रे सदर करारनामाचे भाग समझण्यात यावे, व सदर कागदपत्रातील अटीशर्ती दोन्ही पक्षकारास बंधनकारक राहील.

| | |
|---|---|
| करारनामा लिहुन देणार<br>For M/S. M. E. PROJECT PVT. LTD.<br>Authorised Signature | करारनामा लिहुन घेणार<br>(रवि पवार) |

Scanned with CamScanner

मिरा भाईंदर महानगरपालिका
MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www.mbmc.gov.in
मुख्य कार्यालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मिभा / मनपा / आरोग्य/ १०/२०२२-२३ दिनांक: १८/४/२०२२

## // कार्यादेश //

प्रति,
**मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा. लि.**
बी/406, मयुर कॉ.ऑ.हौ. सोसायटी लि.,
सोडावाला, क्रॉस रोड, बोरिवली (प.), मुंबई, 400092.

**विषय :- नाले सफाई कामी यंत्र सामुग्री, वाहने व कंत्राटी मजुर पुरवठा करणेबाबत.**
संदर्भ :- 1. दि. 23/02/2022 रोजीची निविदा.
2. मा. स्थायी समिती सभा दि. 12/04/2022, ठराव क्र. 02 अन्वये मंजुरी.
3. दि. 18 /04/2022 रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापूर्वी सफाई /खोदाई करणे कामी भाड्याने यंत्र सामुग्री व हंगामी कंत्राटी मजुर पुरवठा करणेकामी निविदेतील वाटाघाटी अंती मंजुर केलेले दर व करारनामा अटीशर्तीनुसार खालीलप्रमाणे यंत्र सामुग्री व हंगामी कंत्राटी मजुरांचा पुरवठा करण्यात यावा.

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | मंजुर दर (सर्व करासहीत) |
|---|---|---|
| A | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2100/- PER HOUR |
| | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2400/- PER HOUR |
| | JCB MACHINE | Rs. 1075/- PER HOUR |
| | TORAS | Rs. 9990/- PER SHIFT |
| | DUMPER | Rs. 7200/- PER SHIFT |
| | HAYDRA MACHINE | Rs. 990/- PER HOUR |
| B | MAN POWER | Rs. 1250/- PER LABOUR /PER DAY (08 HOUR) |

वरील मंजुर दरात संबंधित स्वच्छता निरिक्षक यांच्या मागणीनुसार व नियंत्रणाखाली नाले सफाईची कामे पूर्ण करण्यात यावी. कार्यादेश मिळताच त्वरीत वरीलप्रमाणे यंत्र सामुग्री व हंगामी कंत्राटी मजुरांचा पुरवठा करण्यात यावा.

१८.४.२०२२

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

For M/S. M. E. PROJECT PVT. LTD.
Authorised Signature

(रवि पवार)
उप-आयुक्त (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner